जि. प, पंचायत समित्यांचा १५ व्या वित्त आयोगाचा निधी थांबविला

जळगाव : गेल्या काही वर्षापासून केंद्र सरकार कडून थेट ग्रामपंचायतींना विकास कामांसाठी निधी दिला जात आहे. यात विकास कामांसाठी केंद्र सरकारकडून ग्रा.पंना ८० टक्के तर पंचायत समिती व जिल्हा परिषदांना प्रत्येकी १० टक्के निधी दिला जातो. यंदा २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा पहिला हप्ता म्हणून केंद्राकडून जिल्ह्यातील ११५४ ग्रा.पंना ३२ कोटी ८३ लाख निधी मंजुर झाला आहे.मात्र यावेळी केंद्राने राज्यात प्रशासक असलेल्या जिल्हा परिषदा,पंचायत समित्यांचा निधी थांबविला आहे.त्यामुळे या निधीवर डोळे लावून बसलेल्या जि.प व पंचायत समितीच्या माजी सदस्यांचा हिरमोड झाला आहे.

१५ व्या वित्त आयोगातून २०२२-२३ चा पहिल्या टप्प्याचा निधी आला असल्याने ग्रामपंचायती मालामाल होणार असुन नव्याने होणाऱ्या निवडणूकांमध्ये लोकनियुक्त सरपंच निवडल्यानंतर हा निधी खर्चास मिळणार आहे.यावेळी शासनाने प्रशासक असलेल्या ग्रामपंचायतींचा निधी देखील अडविला आहे. मात्र याचा परिणाम जिल्ह्यात फारसा होणार नाही?अशा फक्त दोन ग्रामपंचायती असुन त्या यावल तालुक्यातील आहे.

जिल्ह्यातील ग्रामपंचायती मालामाल : ३२ कोटी ८३ लाख मिळणार

जि.प व पंचायत समित्यांना फटका

१५ वा वित्त आयोगाच्या १० टक्के निधीचे नियोजन जि.पस्तरावर व तालुक्याच्या ठिकाणी पंचायत समितीस्तरावर केले जाते.मात्र यंदा केंद्राकडूनच प्रशासक असलेल्या जि.प व पंचायत समित्यांचा निधी थांबविला असल्याने माजी जि.प सदस्यांच्या हाती हा निधी मिळण्याची अपेक्षा धुसर आहे. गेल्या वर्षाच्या नियोजनातील कामे प्रशासक काळ असतांना देखील माजी सदस्यांनी आपल्या गटातील कामे प्रस्तावित करून मर्जीतील लोकांना दिली होती. मात्र आता निधीच आला नसल्याने नव्या सदस्यांनाच हा निधी मिळेल हे निश्चित.

केंद्र शासनाचा १५ व्या वित्त आयोगाचा २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा निधी केंद्राकडून मंजुर झाला आहे. जिल्ह्यासाठी ३२ कोटी ८३ लाखाचा निधी मिळणार आहे. येत्या काही दिवसात कोषागारात हा निधी जमा झाल्यानंतर तात्काळ ग्रापंना वितरीत केला जाईल. मात्र शासनाकडून या टप्प्याच्या निधीत प्रशासक असलेल्या ग्रा.पं,जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचा निधी मिळालेला नाही.

-अनिकेत पाटील, डेप्युटी सीईओ, ग्रापं विभाग, जि.प.

गेल्या वर्षी २६ कोटीची कामे,यंदा मात्र भोपळा

गेल्या वर्षी दोन टप्प्यातील १५ वा वित्त आयोगातून २६ कोटीचा निधी मिळाला होता.त्यातून सर्वच सदस्यांना कामे देण्यात आली होती. आता मात्र नव्या सदस्यांना १३ कोटी निधी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे माजी सदस्यांच्या हाती भोपळा मिळणार आहे.येत्या आठवड्यात हा निधी कोषागारात येणार असुन त्यानंतर हा निधी ग्रामपंचायतींना वितरीत केला जाणार आहे.

तालुकानिहाय ग्रा.पं,मिळणारा निधी

अमळनेर: ग्रा.पं ११९ ,निधी २ कोटी २३ लाख ५३ हजार
भडगाव: ग्रा.पं ४९,निधी १ कोटी ४६ लाख ६३ हजार
भुसावळ: ग्रा.पं ३९, निधी १ कोटी ६० लाख ९५ हजार
बोदवड: ग्रा.पं ३८, निधी ७९ लाख ३० हजार
चाळीसगाव: ग्रा.पं ११३, निधी ३ कोटी ७५ लाख २६ हजार
चोपडा: ग्रा.पं ९०, निधी २ कोटी ८० लाख १७ हजार
धरणगाव: ग्रा.पं ७५, निधी १ कोटी ६२ लाख ३६ हजार
एरंडोल: ग्रा.पं ५२, निधी १ कोटी ५४ लाख ४९ हजार
जळगाव: ग्रा.पं ६९, निधी २ कोटी २१ लाख ३१ हजार
जामनेर: ग्रा.पं १०६, निधी ३ कोटी २७ लाख ४४ हजार
मुक्ताईनगर: ग्रा.पं ६१, निधी १ कोटी ६२ लाख ७३ हजार
पाचोरा: ग्रा.पं १००, निधी २ कोटी ६८ लाख १३ हजार
पारोळा: ग्रा.पं ८३, निधी १ कोटी ८५ लाख ६५ हजार
रावेर: ग्रा.पं ९५, निधी २ कोटी ९७ लाख ४४ हजार
यावल: ग्रा.पं ६५, निधी २ कोटी ३९ लाख १४ हजार

कुऱ्हा परिसरातील अनुयायी हरियाणासाठी रवाना

कुऱ्हा काकोडा, ता. मुक्ताईनगर : हरियाणा येथे होऊ घातलेल्या संत निरंकारी मंडळा च्या वतीने ७५ व्या वार्षिक अमृत महोत्सवानिमित्त संत समागमाचे आयोजन करण्यात आले असून या भव्य कार्यक्रमाला कुऱ्हा परिसरातील शेकडो अनुयायी भाविक भक्त रवाना झाले आहे.

मलकापूर येथील रेल्वे स्थानकावरून शेकडो भाविक भक्त संत निरंकारी मंडळाच्या भव्य अशा होणाऱ्या कार्यक्रमासाठी हरियाणा येथे रवाना झाले आहेत अंतत्य उत्साही भावनेने भाविक भक्त गेले आहेत यात महिलांची संख्या लक्षणीय होती यावेळेस संत निरंकारी मंडळाचे राजु मानकर, मुखी माळी महात्मा सेवादल सदस्य प्रबंधक सतिश नागरे उपस्थित होते.

ICICI Home Finance | **कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, भारत.

शाखा कार्यालय : सिटी सर्व्हे क्र. १९७६बी/१+२, इंडिया गॅरेज, साऊथ वेस्टर्न कॉर्नर, पहिला मजला, इंडिया प्लाझा कॉम्प्लेक्स, जिल्हा पेठ, स्वातंत्र्य चौक, जळगाव-४२५ ००१.

(नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा)
स्थावर संपत्तींच्या विक्रीची सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८ (६) च्या तरतुदीअंतर्गत स्थावर संपत्तींच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

तमाम जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण/प्रभारित खालील विवरणीत स्थावर मालमत्ता जिचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला आहे, त्या मालमत्तांची खालील दिलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जी आहे व ''जी काही आहे तेथे आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/हमीदार/ कायदेशीर वारस यांचे नाव, कर्ज खाते क्र.	ज्ञात भारांसमवेत, काही असल्यास, प्रतिभूत संपत्तीचा तपशील	थकीत रक्कम	राखीव मूल्य / इसारा रक्कम ठेव	मालमत्ता परीक्षण दिनांक व वेळ	लिलाव दिनांक व वेळ
ए	बी	सी	डी	ई	एफ	जी
१.	शेख चांद शेख फरीद गवळी (कर्जदार), अफसाना शेख चांद गवळी (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. : एलएचजेएलएन००००१३१४४४७	सर्व्हे क्र. ८७ए/२, प्लॉट क्र. ६, फ्लॅट क्र. १३ (फ्लॅट क्र. ३०१), स्वामी नारायण प्लाझा, अमेय अपार्टमेंटच्या समोर, तापीनगर, यावल रोड, सातारे शिवार, भुसावळ, जि. जळगाव	रु. ३३,९५,७१४.०० दि. १० नोव्हेंबर २०२२	रु. २८,९८,०००/- / रु. २,८९,८००/-	दि. २५ नोव्हेंबर २०२२ रोजी स ११.०० ते दु. ३.००	दि. ३० नोव्हेंबर २०२२ रोजी दु. २.०० ते दु. ३.००

आमची लिलाव एजन्सी ऑक्शन टायगर यांच्या वेबसाइट (यूआरएल लिंक https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/) वर ऑनलाइन लिलाव आयोजित करण्यात येईल. गहाणवटदार/नोटिशींना याद्वारे दि. **२९ नोव्हेंबर २०२२ रोजी सायं. ५.००** पूर्वी संपूर्ण थकीत रकमेचे पुढील व्याजासहित प्रदान करण्याची शेवटची संधी देण्यात येत आहे, अन्यथा प्रतिभूत संपत्तीची वरील वेळापत्रकानुसार विक्री करण्यात येईल.

प्रस्तावित बोलीदारांना **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, सिटी सर्व्हे क्र. १९७६बी/१+२, इंडिया गॅरेज, साऊथ वेस्टर्न कॉर्नर, पहिला मजला, इंडिया प्लाझा कॉम्प्लेक्स, जिल्हा पेठ, स्वातंत्र्य चौक, जळगाव-४२५ ००१** येथे दि. **२९ नोव्हेंबर २०२२ रोजी दु. ४.००** वाजता वा तत्पूर्वीपर्यंत आरटीजीएस/धनाकर्षाद्वारे (डीडी) (कॉलम ई पाहा) इसारा रक्कम ठेव (इरठे) सादर करणे अनिवार्य असेल. कृपया नोंद घ्यावी की, प्रस्तावित बोलीदार वर उल्लेखित केलेल्या वेळेनुसार त्यांचे प्रस्ताव सादर करू न शकल्यास निविदा दस्तावेजांची स्वाक्षरित प्रत **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, सिटी सर्व्हे क्र. १९७६बी/१+२, इंडिया गॅरेज, साऊथ वेस्टर्न कॉर्नर, पहिला मजला, इंडिया प्लाझा कॉम्प्लेक्स, जिल्हा पेठ, स्वातंत्र्य चौक, जळगाव-४२५ ००१** येथे दि. **२९ नोव्हेंबर २०२२ रोजी सायं. ५.००** वाजता वा तत्पूर्वीपर्यंत सादर करावी. इसारा रक्कम ठेवीचा धनाकर्ष (डीडी) हा ''**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.** - ऑक्शन'' या नावे **भुसावळ** येथे देय राष्ट्रीयीकृत/शेड्युल्ड बँकेकडील असावा.

परीक्षण, लिलावाच्या अटी व शर्ती किंवा निविदा सादरीकरणासंदर्भातील कोणत्याही पुढील स्पष्टीकरणासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांना ७०२१०७२८६९** येथे संपर्क साधावा.

कोणतेही कारण न देता कोणतीही वा सर्व बोली रद्द करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखून आहे.

विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया https://www.icicihfc.com/ येथे भेट द्या.

दिनांक : १५ नोव्हेंबर २०२२
ठिकाण : जळगाव

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

भुसावळात रेशनिंगचा तांदूळ काळ्या बाजारात

अवैध साठा पोलिसांकडून जप्त : गुन्हा दाखल

भुसावळ : शहरातील लिंबू मार्केट,आठवडे बाजार येथे एका ट्रक मध्ये रेशनिंगचा तांदूळ भरला जात आहे अशी गोपनीय माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी यांना मिळाली. बाजारपेठ पोलीस स्टेशनच्या पोलीस पथकाला घटनास्थळी पोहचून मिळालेल्या माहितीची खात्री केली असता अवैध तांदुळाची साठा मिळून आला असून दोन गोडावून सील करण्यात आले.

अवैधरित्या तांदुळाची वाहतूक व साठा होत असल्याबाबत खात्री झाल्याने दि.१३ रोजी १२.१५ वाजेच्या सुमारास लिंबू मार्केट,आठवडे बाजार भुसावळ व भारत नगर दगडी पूल जवळ भुसावळ याठिकाणी असलेल्या गोडावून मध्ये अजिंक्य जैन,राहुल नारायण कानडे उर्फे राहुल लोणारी यांनी सदर रेशनिंग तांदूळ हा विक्री करण्याच्या उद्देशाने अवैधरित्या साठवणूक केल्याचे मिळून आल्याने पोलीस पथकाने छापा टाकला.घटनास्थळा वरून सहाटायरांचा एका ट्रक क्रमांक (एम.एच,०४ ए.एल. ७१३०) त्यामध्ये ४६ पांढऱ्या रंगाच्या रेशन तांदूळ गोण्या अंदाजे ५० किलो १३हजार ८०० रुपये किंमतीच्या,पिअँजो कंपनीची अँपे रिक्षा क्रमांक एम.एच.१९ सी.डब्यु. ०३५२ एक लाख ५० हजार रुपये किंमतीची, अँपे रिक्षामध्ये मिळून आलेला रेशन तांदूळ १९ गोण्या अंदाजे ५० किलो ५,७०० रुपये किमतीच्या,लिंबू मार्केट,आठवडे बाजार येथे मिळून आलेला रेशन तांदूळ २० ते २५ टन २ ला ५० हजार रुपये किंमतीचा,भारत नगर येथे मिळून आलेला रेशन तांदूळ शासकीय लेबल असलेले सूतळी ८९ गोण्या व पांढऱ्या रंगाच्या १३ गोण्या अंदाजे ५० टन वनजच्या ३०,००० रुपये किमतीच्या,भारत नगर येथे मिळून आलेला रेशन गहू २० कट्टे अंदाजे १ टन वजनाचे १० हजार असे एकूण ९ लाख ५९ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेऊन उपविभागीय पोलीस कार्यालय आवारात ट्रक व अँपे रिक्षा मुद्देमाल सह लावण्यात आलेली आहे.

यावेळी ट्रक चालक शेख मोबिन शेख अजीज राहणार सिव्हिल कॉलनी बायपास देऊळगांव राजा ,बुलढाणा.अँपे रिक्षा चालक रईस बागवान असलम बागवान,भुसावळ. हमाल अकबर अली शेख बिस्मिल्ला,शिवाजी नगर,भुसावळ. शहबाज शेख इकबाल, शिवाजी नगर, भुसावळ.मुजफ्फर मेहमूद सैय्यय, भुसावळ. शेख इकबाल शेख बिस्मिल्ला भुसावळ. सोमनाथ कृष्णा सूर्यवंशी यांनी अवैधरित्या साठवणूक केलेला रेशनिंग तांदूळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहतूक करतांना किंवा विल्हेवाट करतांना मिळून आले. बाजारपेठ पोलीस स्टेशनला फिर्यादी पोना यासीन सत्तार पिंजारी यांनी दिल्यावरून सर्वांच्या विरोधात जीवनावश्यक वस्तू कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश गोंटला व पोलीस नाईक सुभाष साबळे करीत आहेत.

जिल्ह्यात लंपी नियंत्रणासाठी 'माझा गोठा, स्वच्छ गोठा' मोहीम

जळगाव : जिल्ह्यात लम्पी रोग नियंत्रणासाठी जनतेचा सहभाग आवश्यक आहे. त्यासाठी जळगाव जिल्ह्यात माझा गोठा, स्वच्छ गोठा ही मोहीम राबविण्याच्या सूचना संबंधित पशूधन अधिकाऱ्यांना दिल्या असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एस.व्ही. सिसोदे यांनी दिल्या आहे.

लम्पी चर्म रोग नियंत्रण व रोग मुक्त महाराष्ट्रासाठी माझा गोठा, स्वच्छ गोठा या मोहिमेंतर्गत राज्यातील बाधित शहरे, गावे, वाडयावस्त्या, पाडे व तांडे येथील पशुधनाचे सर्वेक्षण आणि लंम्पी चर्म रोग नियंत्रणासाठी पशुपालकांना जैवसुरक्षा उपाय व अनुषंगीक आवश्यक प्रशिक्षण द्यावयाचे आहे. ही मोहीम राज्यात ७ नोव्हेंबरपासून ते ६ डिसेंबर या कालावधीमध्ये घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. लंम्पी नियंत्रणासाठी ७ नोव्हेंबरपासून ही मोहीम राबवावयाची असून या मोहीम कालावधीमध्ये बाधित गावामध्ये गोठा भेटी घेण्यासाठी सर्वेक्षण पथके तयार करण्यात यावी, एका पथकामध्ये एक पशुवैद्यकीय अधिकारी, कर्मचारी अथवा पशुसंवर्धन विभागातील सेवानिवृत्त अधिकारी आणि स्थानिक ग्रामपंचायत, नगरपरिषद यांचेकडील २ स्वयंसेवक समवेत राहतील. हे पथक पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील गावांना मोहीम कालावधी दरम्यान भेट देईल. बाह्य किटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापिठाने प्रसारीत केलेल्या सुधारीत मार्गदर्शक तत्वानुसार गोठ्याची स्वच्छता, परिसर स्वच्छता, पशुधनाच्या शरीरावरील किटकांचे व्यवस्थापन, इत्यादीची तातडीची अमलबजावणी करण्यात यावी,यासाठी आवश्यक किटकनाशके व साधन सामग्री सर्व संस्थांना उपलब्ध करण्यात यावी, लोकप्रतिनिधी, ग्रामविकास, महसुल विभागातील अधिकारी, कर्मचारी, खाजगी पशुचिकित्सक व सेवादाता यांचा या मोहिमेसाठी सहभाग घेण्यात यावा, अशा सूचना जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एस.व्ही. सिसोदे यांनी दिल्या आहेत.

संत निरंकारी सेवा मंडळतर्फे रक्तदान शिबिर

धरणगाव : धरणगाव येथील मोठा माळीवाडा परिसरातील सावता माळी सुधारणा मंडळ यांचा मढीत संत निरंकारी सेवा मंडळ तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळेस ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले रेड क्रॉस सोसायटी जळगाव यांनी शिबीर घेतले. तसेच निरंकारी सेवा मंडळाचे सेवेकरी यांनी सांगितले की मानवाला रक्ताची गरज भासते देशासाठी रक्तदान करणे महत्त्वाचे आहे दरवर्षी आम्ही संत निरंकारी मंडळातर्फे हा कार्यक्रम घेतो रक्तदान श्रेष्ठदान आहे, असे सेवेकरी मंडळानी सांगितले.

खामखेडासह उंचदा येथे राष्ट्रवादीची जनसंवाद यात्रा

मुक्ताईनगर : राष्ट्रवादी जनसंवाद यात्रेच्या चौतीसाव्या दिवशी माजी मंत्री एकनाथराव खडसे,जिल्हाध्यक्ष ॲड. रविंद्र पाटील, महाराष्ट्र वस्त्रोद्योग महासंघाच्या उपाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी खामखेडा, मुंढोदे, पुर्नाड आणि उचंदे येथील ग्रामस्थांसोबत संवाद साधलायावेळी यात्रा प्रमुख ईश्वर रहाणे, निवृत्ती पाटील, तालुका अध्यक्ष यु.डी.पाटील, जि प सदस्य निलेश पाटील, माजी सभापती सुधाकर पाटील,दशरथ कांडेलकर, राजु माळी, प्रदिप साळुंखे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष पवनराजे पाटील, यात्रा सहप्रमुख रामभाऊ पाटील,मनिषा ताई देशमुख, आम्रपाली पाटील, या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

पुण्यनगरी CLASSIFIED

पाहिजेत

घरकामासाठी महिला, मुली, जोडपे, कुक, हॉटेल स्टाफ, नर्स (राहणे+खाणे) 8976034958 / 8976034959
MUM2022B.2102257939

मेडिकल स्टोअर साठी अनुभवी सेल्समन आणि डिलिव्हरी बॉय पाहीजे (मुंबई, घाटकोपर) (राहण्याची, खाण्याची सोय) Contact No- 7020516380, 9869048931, 8689908360
OT02022SA002261164

मॅनेजर पदासाठी पर्मनंट भरती मुले/मुली शिक्षण 10वी ते पदवीधर (पास - नापास) वय 18 ते34 पगार योग्यतेनुसार राहणे+जेवण फ्रि पत्ता: दामोदरनगर पाथर्डीफाटा नाशिक 7774928763
DHU2022Y.002259587

नाशिक ऑफीस मॅनेजमेंटसाठी मुले/ मुली परमनंट बेसेसवर भरती वय 28 कमवा 18 ते 30000 राहणे फ्री 8888914669
DHU2022S.1202258728

प्रत्येक तालुक्यात विविध योजना नोंदणी कामासाठी मुले/ मुली पाहिजे. 9822907454
DHU2022S.1202260746

मार्केटींगसाठी अनुभवी लेडीज/ जेन्टस् पाहिजे. 15 ते 20 हजार पगार राहणे फ्री मो. 8010829071
DHU2022S.1202253641

नासिक गंगापूररोड येथे घरगुती कामासाठी ड्रायव्हर पाहिजे. पत्नी स्वयंपाक करणारी असेल तर प्राधान्य. छोटे कुटूंब असल्यास रहाण्याची सोय संपर्क संध्या ४ते ९पर्यंत मो 9011079070
DHU2022Y.002261247

जनलक्ष्मी Ltd कं ला MH ला पाहिजेत फिल्ड ऑफिसर एजंट पगार 25K 7599735423 , 7599429980
OT02022SA002261267

वयोवृद्ध पेशंटसाठी सिस्टर, वॉर्डबॉय, आया पाहिजेत. संपर्क: 9850600780
DHU2022Y.002261260

जाहिरातीसाठी संपर्क 9881875551

नाशिक कॉलेजरोडवर घरी काम करण्यासाठी पूर्णवेळ महिला पाहिजे. राहण्याची सोय. तसेच त्र्यंबकेश्वर फार्म हाऊसवर जोडपे पाहिजे. राहण्याची उत्तम सोय. 9822068250
DHU2022S.1202260752

आयुर्वेदिक कंपनीला शिक्षित, बेरोजगार, महिला/पुरुष घरबसल्या औषध पॅकिंग करुन महीना 25000/ -- 30000/ - कमवा, NOC शुल्क 2150/ - संपर्क : 6290448329
MUM2022B.2102259994

नाशिकला हॉटेलसाठी इंडियन चायनीज, तंदूरवाला, कुक, मोरीवाला 9370873472
DHU2022S.1202259114

घरी बसून मोबाईल द्वारा मेसेज पाठविण्याचे काम करा. कॉल : 7581000670.
PUN2022K.2502259577

जागाविषयक

लहान, मोठे कमर्शियल, निवासी प्लॉटस् विक्री/ डेव्हलपमेंट व्यवहारासाठी अचुक सुरक्षित व फायदेशीर सल्ला 9890430888
DHU2022S.1202255641

विकणे आहे

1 BHK फ्लॅट विकणे आहे. हनुमानवाडी पंचवटी नाशिक संपर्क 9822526065
DHU2022S.1202260109

विवाहविषयक

वधु 28, उंची 5.4, शि 10वी, घरगुती खानावळ आहे. प्रति 15000 /- शेतकरी/ नोकरी यांना प्राधान्य त्वरीत विवाह करणे. मो. 8421896380
DHU2022S.1202260761

जाहिरात स्वस्त प्रतिसाद मस्त

रोज वाचा पुण्यनगरी

जाहिरात छोटी किमया मोठी

कर्जविषयक

वाचकांसाठी विनम्र सूचना

'पुण्यनगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **'पुण्यनगरी'** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल **पुण्यनगरी** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे **जबाबदार राहणार नाही,** याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.
AUR2022SA002197313

ज्योतिषविषयक

फिस इच्छानुसार A TO Z समस्यांचे समाधान फोनवर. बाबा अमन 9088550962
MUM2022B.2102258636

सिध्दीविनायक ज्योतिष जिवनकी समस्योंका समाधान पुजाविधी जन्माक्षर नोकरी व्यापार लग्नयोग संतानसुख शारिरीक मानसिकपिडा व्यसनमुक्ती लव्ह प्रॉब्लेम स्पेशालीस्ट 9922619524 9421539390
DHU2022V.2702259131

इतर

रुपाली पार्टटाईम M/F 100% जॉब, रोज कमवा 15000/- मो. 7843097248
NAG2022R.702261240

वाचकांना सूचना

विशेष सूचना

जाहिरातीचे बिल आकारताना जाहिरातीच्या फॉर्मवर दिलेल्या मूळ शब्दांच्या ओळींनुसार जाहिरातीचे बिल आकारले जाते. यासंदर्भात पुढे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, प्रसिद्धीसाठी दिलेला मजकूर इंग्रजीत असल्यास जाहिरातीच्या फॉर्ममधील मूळ इंग्रजी ओळींच्या संख्येनुसारच जाहिरातीचे बिल आकारले जाईल. त्यासाठी भाषांतरीत केलेल्या (मराठी वा हिंदी) मजकूराच्या ओळींनुसार ते आकारले जाणार नाही. जाहिरात फॉर्मवरील ओळी व प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीच्या ओळी यांमध्ये तफावत असू शकते, याची एजन्सी व जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक
AUR2022SA002197342

जाहीर/सायटेशन- नोटीस

ॲड.स्वप्निल पाटील

जळगाव येथील २ रे सह दिवाणी न्यायाधिश व स्तर सो. यांचे न्यायालयात

प्रोबेट अर्ज ०३/२०२२
नि.०६
पु.ता.१३/१२/२०२२

१.डॉ.शिवाजी माधव सरोदे, उ.व.६२, धंदा-डॉक्टर
२. सौ.मृदुल शिवाजी सरोदे, उ.व.६०, धंदा-गृहिणी
३. श्री.रुद्रप्रताप शिवाजी सरोदे, उ.व.३१, धंदा-नोकरी
४. सम्राज्ञी शिवाजी सरोदे, उ.व.२८, धंदा-नोकरी
सर्व रा.२१४, स्टेशन रोड, नवी पेठ, जळगाव, ता.जि.जळगाव .... अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही .... सा.वाला

अर्ज :- भारतीय उत्तराधिकारी १९२५ चे कलम ०२ प्रमाणे प्रोबेट दाखला लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन मिळणेसाठी अर्ज

विमल माधव सरोदे ह्या आजारी असल्याने त्यांचा दिनांक २५/०५/२०१० रोजी मृत्यू झाला आहे. मयत विमल माधव सरोदे यांनी त्यांच्या मृत्यु पत्रामध्ये खालील प्रमाणे जंगम मिळकत नमूद केलेली आहे.

१. चांदीची भांडी- ताब्या, फुलपात्र-६, ताट-६, वाट्या-१२, चमचे-१२, जग-१ इ. चांदीच्या वस्तु अर्जदार नं.१ यांना देण्याचे मृत्युपत्रामध्ये नमूद केलेले आहे.

२. हिऱ्याचे कडे, हिऱ्याच्या कुड्या, बाजुबंद पाटल्या-२, अंगठी वळ-२, ब्रेसलेट-१, इ. वस्तु अर्जदार नं.२ यांना देण्याचे मृत्युपत्रामध्ये नमूद केलेले आहे.

३. रोख रक्कम रु.२०,०००/- दागिने बाजुबंद, लक्ष्मीदर, बांगड्या-६ (सिंगापुर), गोठ-२, पाटल्या-२, बदाम हार, बोर माळ, ब्रेसलेट गोफ, अंगठी वळ-१, चेन, अंगठी लाल, खड्याची चैन वाघनख इ. वस्तु अर्जदार नं.३ यांना देण्याचे मृत्युपत्रामध्ये नमूद केलेले आहे.

४. रोख रक्कम १०,०००/- बागड्या-४, पाटल्या -२, गट्टूमाळ-१, बाजुबंद हार-१, श्रीमंती हार-१, गोठ-१, जोड, अंगठी पोवळ्याची -१, चेन व पेंडंट गोफ-१ इ. वस्तु अर्जदार नं.४ यांना देण्याचे मृत्युपत्रामध्ये नमूद केलेले आहे. मयत विमल माधव सरोदे यांनी दिनांक ०९/०५/२००८ रोजी अर्जदार यांच्या नावे व हक्कात मृत्युपत्र लिहून ठेवलेले [illegible]

सायटेशन नोटीस

ॲड.एस.एम.कलंत्री

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११९/२०२२
निशाणी क्र.
पु.चौकशी तारीख ११/१२/२०२२

मुक्ताईनगर येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात

मृत व्यक्ती मनोहर केशव पाटील मौजे पारंबी ता.मुक्ताईनगर, जि. जळगाव सामान्यत: राहणार किंवा संपत्ती बाळगणाऱ्याच्या मृत्यूपत्राचे संप्रमाण/या मृत [illegible]

टायटल व्हेरिफिकेशन व सावधानतेची जाहीर नोटीस

सर्व लोकांना, वित्तीय संस्थांना, बँकांना, तमाम जनतेस, महसूल विभाग व तसेच आरती अनिल अग्रवाल, रा.राम मंदिर वार्ड, भुसावळ यांना व त्यांच्या कुटुंबातील लोकांना, नातेवाईकांना, मित्र मंडळी वगैरे यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते ते येणेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन :- मौजे मेहरुण येथील गट क्र. १६४/१/प्लॉट नं.३४ ह्याचे क्षेत्र चौ.मी. २८९.०० ही अशी बखळ [illegible]

जाहीर - नोटीस

ॲड.के.बी.सोनार

जळगाव येथील मे.४ थे सह दिवाणी न्यायाधिश व स्तर सो. यांचे न्यायालयात

रे.मु.नं.२७७/२०२२
निशाणी ०९
चौकशी ता.१७/१२/२०२२

१.श्रीमती मंगला अनिल दुसाने, उ.व.५४, व्यवसाय-घरकाम
२. श्रीयुत देवेंद्र अनिल दुसाने, उ.व.२७, व्यवसाय- मजुरी
३. श्रीयुत राज अनिल दुसाने, उ.व.२०, व्यवसाय- शिक्षण
[illegible]

जाहीर नोटीस

[illegible]

जाहीर नोटीस

अमळनेर येथील मे.दिवाणी [illegible]

१. अभय ईश्वरलाल गोहील, उ.व. ४८, धंदा-व्यापार, रा. न्यु प्लॉट, अमळनेर, [illegible]
२. कल्पना राजेश वाघेला, [illegible] रा. १०६अ, विरनगर, उज्जै[illegible]
३. सिमा सचिन झाला, [illegible] रा. एफ-१, विमल क्लासी[illegible] भगवती अपार्टमेंट, बंगलो[illegible]

विरुध्द

कोणीही नाही

Application for Heirship Certificate Under Bombay Regulation VIII of 1827

[illegible]

जाहीर नोटीस

ॲड.नितीन सुरवाडे

[illegible]

जाहीर नोटीस

ॲड.अशफाक सैय्यद

[illegible]

जाहीर नोटीस

तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, विकास सोसायटी [illegible]

ॲड.पराग अ.शिरसमणे

[illegible]